# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.03.2025** **वार- सोमवार**

---

**<u>फुलेदांपत्य भारतरत्न अजित पवार</u>**

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना 'भारतरत्न' पुरस्कार प्रदान करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याचा ठराव विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये आज एकमतानं मंजूर झाला. हा ठराव ऐतिहासिक असून प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी महाराष्ट्राच्या लौकिकात भर घालणारा आणि भारतरत्न पुरस्काराचा गौरव वाढवणारा आहे अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला आहे.

**<u>मुख्यमंत्री मोहोळ</u>**

पुण्यातल्या मंगळवार पेठेतील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनालगतची अडीच एकर जागा त्यांच्या स्मारकासाठीच राहील. यासंदर्भात लवकरच निर्णय घेऊन ही जागा स्मारकासाठी उपलब्ध करून दिली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्र्यांच्या कालच्या पुणे दौऱ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन विस्तारीकरण समितीच्या शिष्टमंडळानं त्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात सकारात्मकता दर्शवल्यानं, स्मारकाचा मार्ग प्रशस्त झाल्याची भावना शिष्टमंडळातल्या प्रतिनिधींनी व्यक्त केली.

**हवामान दिन**

जागतिक हवामान दिन काल साजरा झाला; यानिमित्त पुण्यात शिवाजीनगर इथल्या हवामानशास्त्र विभागाच्या परिसरात आज प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. या प्रदर्शनात हवामान शास्त्र विभागाशी निगडित विविध उपकरणं , हवामान प्रणाली, देशातल्या विमानतळांवर असणारी हवामान मार्गदर्शक स्थानकं, याबरोबरच पुण्यातील हवामान विभागाच्या वतीनं अंटार्टिका मध्ये चालवण्यात येणाऱ्या अभ्यास मोहिमा याविषयीची माहिती देण्यात येत आहे.

**शेतकरी ओळख**

राज्यात आतापर्यंत ७६ लाख ३९ हजार ८५२ शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात आला आहे. यात अहिल्यानगर जिल्ह्यानं आघाडी घेत ५ लाखांचा टप्पा ओलांडला आहे. तर नाशिक जिल्हा ४ लाख ५० हजार ६४० ओळख क्रमांक देऊन दुसऱ्या क्रमांकावर आहे. पुणे जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर असून जिल्ह्यात एकंदर ४ लाख ३४ हजार ६३२ शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात आला आहे.

**दळवी**

विख्यात लेखक जयवंत दळवी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागानं कॅलिडोस्कोप:जयवंत दळवी या विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. उद्या संध्याकाळी  बालगंधर्व रंगमंदिरात होणाऱ्या या कार्यक्रमाचं उद्घाटन गिरीश जयवंत दळवी यांच्या हस्ते होणार असून स्वाती चिटणीस, संजय मोने, राजेश दामले यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी जयवंत दळवी यांच्या साहित्यावर आधारित दृकश्राव्य कार्यक्रम आणि अभिवाचन होणार आहे.

**उष्माघात विशेषकक्ष सुरू**

राज्याच्या विविध भागात उष्णतेची तीव्रता वाढत असून उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागानं नागरिकांना खबरदारीचा इशारा दिला आहे. आरोग्य विभागानं सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये

उष्णतेशी संबंधित समस्यांवर उपचार करण्यासाठी विशेष कक्ष सुरू केले आहेत. सर्व जिल्हा आणि महापालिका स्तरांवरील साथरोग वैद्यकीय अधिकाऱ्यांना उष्माघात विषयक प्रशिक्षण देण्यात आलं आहे.

**<u>टाकीस्वच्छत</u>**

पुण्याच्या काही भागामध्ये जीबीएसचे रुग्ण आढळल्यामुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टाक्यांची स्वच्छता पुणे महापालिका करत आहे. आतापर्यंत १४४ पैकी ६० टाक्यांची स्वच्छता केल्याची माहिती पुणे महापालिकेचे अतिरिक्त पृथ्वीराज बी पी यांनी आज पत्रकारांना दिली.

**<u>प्रकल्प</u>**

पुणे शहरातल्या तीनशेहून अधिक मोठ्या गृहप्रकल्पात उभारण्यात आलेल्या सांडपाणी आणि मैलापाणी प्रक्रिया प्रकल्पांसाठी पुणे महापालिका धोरण तयार करणार आहे. या प्रकल्पांचा दर्जा, त्यांची क्षमता, आवाज, बंद प्रकल्पांच्या दंडाच्या रकमेत वाढ आदींचा समावेश आहे. या संदर्भात पुणे महापालिकेत झालेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत विविध मुद्यावर चर्चा झाली.

**<u>डक्ट घोटाळा</u>**

पुणे महापालिकेत २६ हजार कोटी रुपयांचा केबल वाहिनी गैरव्यवहार झाला असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस सुनील माने यांनी केलं आहे. या भ्रष्टाचाराबाबत पुणे महानगरपालिकेनं कोणतीही कारवाई केली नसल्याचं माने यांनी म्हटलं आहे; तसंच त्यांनी पोलिस सहआयुक्त रंजनकुमार यांना निवेदन पाठवून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

**<u>उत्सव</u>**

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि केंद्र सरकारचं पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, यांच्या संयुक्त विद्यमानं, एक भारत श्रेष्ठ भारत अंतर्गत लोकोत्सव या तीन दिवसीय उत्सवाचा चिंचवड इथं समारोप झाला. महाराष्ट्र आणि ओरिसा राज्यातील संस्कृतीचं दर्शन या उत्सवात सादर करण्यात आलं.

**बुद्धिबळ**

पुणे जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने विविध वयोगटसाठी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये ओम रानगुडे, आशी दलाल, प्रितिका नंदी, रेयांश यादव, मितांश देशमुख, वरद मोरे यांनी आपापल्या गटात अव्वल क्रमांक पटकावला. स्विस लीग पद्धतीने झालेल्या या स्पर्धेत सहा फेऱ्या पार पडल्या.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 तर किमान तापमान 17 पूर्णांक 7 अंश सेल्सिअस नोंदण्यात आलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचं
पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**